**नियमित दिवाणी दावा क्र.१९०/२०२२ मधील नि.क्र.५५ वरील आदेश**

(CNRNOMHSNo70011982022)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे न्यायालयीन आयुक्त नियुक्तीसाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, वादीने प्रतिवादींविरुध्द, वाटप, निरंतर व कारक मनाईकरीता दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ यांचे पूर्वज शामराव यांनी दावा मिळकतीमधील ०.५४ आर क्षेत्र हे लक्ष्मण यांचेकडून खरेदी घेतलले आहे. सदर खरेदी घेतलेल्या क्षेत्रातूनही प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी व अन्य हिस्सेदारांना पूर्व–पश्चिम रस्ता सोडलेला आहे. त्यात प्रतिवादी क्र.१ व २ यांचे ०.०३ आर क्षेत्र गेलेले आहे. त्याचप्रमाणे सदर रस्त्यापासून वादीने नकाशात दाखविल्याप्रमाणे विहीरीपर्यंतही स्वतःच्या हिश्यातूनच रस्ता दक्षीण–उत्तर असा सोडलेला आहे. तोच रस्ता पुढे दक्षीणेकडे राजाराम व प्रतिवादी क्र. १ व २ यांचे हिश्श्यातून दक्षीणेकडे सोडला असून तो पुढे दक्षीणेकडून पश्चिमेकडे म्हणजे १९८३ सालच्या वाटपाप्रमाणे भारत शेजाळ यांच्या हिश्श्यातून विहीरीपर्यंत सोडलेला आहे व तशी वहिवाटही सन १९८३ च्या वाटपापासून आजपर्यंत कायम होती. परंतु अलिकडे वादी यांनी प्रतिवादी क्र.८ यांना सांगून दक्षीणेकडे विहीरीकडे जाणारा रस्ता नांगरलेला आहे व सदर रस्त्याने प्रतिवादी क्र. १ व २ यांना जाणेस मज्जाव केलेला आहे.

०३. प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी व त्यांचे पूर्वहक्कदार यांना इजमेंट बाय प्रिस्क्रीपशन ने इजमेंटचे हक्क निर्माण झालेले आहेत. तसेच अलिकडे दावा दाखल करण्यापूर्वी प्रस्तुत कामातील वादी यांनी प्रतिवादी क्र. ८ यांना सांगून दक्षीणेकडे विहीरीकडे जाणारा रस्ता नांगरलेला आहे. प्रस्तुत दाव्यात वादी यांचा पुरावा सुरु झालेला आहे. तथापी वर नमूद केल्याप्रमाणे वाद मिळकतीची वस्तुस्थीती न्यायालयासमोर येण्याकरीता सदर कोर्ट कमिशन होणे अत्यंत आवश्यक

झाले आहे. सदरची संपूर्ण वस्तुस्थीती ही प्रतिवादी हे अन्य कोणत्याही पुराव्याव्दारे न्यायालयात आणू शकत नाहीत. करीता सदरची संपूर्ण वस्तुस्थिती स्वतंत्र न्यायालयीन आयुक्तांमार्फत न्यायालयासमोर येणे न्यायोचित झाले आहे. त्याकरिता न्यायालयीन आयुक्तांची नेमणुक करण्याची मागणी प्रतिवादी यांनी केली आहे.

०४. प्रस्तुतच्या अर्जास वादी यांनी नि.क्र. ५७ अन्वये म्हणणे सादर करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. वादी यांनी अर्जातील सर्व कथने नाकारलेली असून असे कथन केले आहे की वादी यांचा नि.क्र. ५ वरील तुर्तातुर्त अर्ज गुणदोषावर चालून मंजूर झालेला आहे. सदर आदेशावर प्रतिवादी यांनी कोणतेही अपील केलेले नाही. नि.क्र. ५ वरील आदेश अस्तीत्वात असताना वादी यांच्या वहिवाटीचा रस्ता प्रतिवादीने नांगरलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचा प्रस्तुत अर्ज चालण्यास पात्र नाही. प्रतिवादी हे न्यायालयीन आयुक्त यांची नेमणुक करुन पुरावा गोळा करण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रस्तुत अर्ज फेटाळण्याची विनंती वादी यांनी केली आहे.

५. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्र याचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

६. वरील सर्व बाबींवरुन सदर अर्ज निकाली काढण्यासाठी खालील मुददे निघत असुन त्यावरील माझे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह देत आहे :-

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी असे सिध्द करतात काय की, सदर प्रकरणात प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे 'न्यायालयीन आयुक्त' यांची नेमणूक करणे संयुक्तीक आहे? | नकारार्थी |
| २. | काय आदेश व खर्च? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## :कारणमिमांसा:

**मुददा क्र. १ करीता:**

७. प्रस्तुतचा दावा वादी यांनी वाटप, निरंतर व कारक मनाईकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत अर्ज दाखल करुन प्रतिवादी यांनी न्यायालयीन आयुक्तांची नियुक्ती करुन वादी यांना उपलब्ध असलेल्या रस्त्याची पाहणी करुन तसा अहवाल मागविण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी यांच्या कथनानुसार, न्यायालयीन आयुक्तांची नियुक्ती करुन वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीच्या येथील वस्तुस्थीती काय आहे हे न्यायालयासमोर येईल व योग्य न्यायनिर्णय देण्यास मदत होईल. अभीलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणामध्ये नि.क्र. ४६ वर मुददे काढण्यात आले असून प्रकरण वादी यांच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी यांनी आजअखेर पुरावा दाखल केलेला नाही. न्यायालयीन आयुक्तांची नियुक्ती केल्यानंतर त्यांच्या अहवालाची उपयोगिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम १० मध्ये देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर तरतुदीचे अवलोकन करणे न्यायोचित ठरते.

**दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम १० (२)**

*आयुक्तांचे प्रतिवृत व त्याने घेतलेला पुरावा–मात्र प्रतिवृताविना असलेला पुरावा नव्हे– हा दाव्यातील पुरावा असेल व तो अभीलेखाचा भाग होईल, परंतु न्यायालयास किंवा न्यायालयाच्या परवानगीने दाव्यातील कोणत्याही पक्षकारास, आयुक्ताकडे निर्देशित केलेल्यांपैकी किंवा त्याच्या प्रतिवृतात उल्लेखिलेल्यापैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात किंवा त्याच्या प्रतिवृत्तासंबंधात किंवा त्याने ज्या प्रकारे अन्वेषण केले असेल त्या पध्दतीच्या संबंधात, खुद्द आयुक्तांची खुल्या न्यायालयात जातीने तपासणी करता येईल.*

०८. वरील तरतुदीनुसार न्यायलयीन आयुक्त यांनी सादर केलेला अहवाल हा पुरावा म्हणून वाचता येतो. म्हणजेच प्रतिवादींनी न्यायालयीन आयुक्तांची नियुक्ती करण्याबाबत दाखल केलेला अर्ज हा पुराव्यासाठी विचारात घेता येईल. अशा परिस्थीतीत दाव्याची सदयस्थिती विचारात घेणे आवश्यक ठरते. प्रस्तुत दावा आता

वादीच्या पुराव्यासाठी प्रलंबित आहे. त्यामुळे वादीने पुरावा दाखल करुन त्याच्या दाव्यातील कथने सिध्द करणे आवश्यक आहे. त्यानंतर प्रतिवादीचा पुरावा सुरु होईल. प्रतिवादी यांना वादीच्या पुराव्यानंतर पुराव्याची संधी मिळणार आहे. असे असताना वादीचा पुरावा अभीलेखावर येण्यापूर्वीच प्रतिवादी यांच्या प्रस्तुत अर्जान्वये जर न्यायालयीन आयुक्तीची नियुक्ती केली तर वादीच्या पुराव्यापूर्वी प्रतिवादीचा पुरावा विचारात घेतल्यासारखे होणार आहे. जर न्यायालयीन आयुक्तांची नियुक्ती केली तरी केवळ न्यायालयीन आयुक्तांच्या अहवालावरुन न्यायालय कोणत्याही निष्कर्षावर येवू शकणार नाही. त्यामुळे सर्वप्रथम वादी यांना पुराव्याची संधी देणे न्यायोचित ठरते. सबब  मुददा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.

**<u>मुददा क्र. २ करीता</u>:**

९. मुददा क्र. १ वरील सर्व बाबीं विचारात घेता प्रतिवादीच्या पुराव्याच्यावेळी नवीन अर्ज दाखल करण्याची प्रतिवादीला सूट देवून प्रस्तुत अर्ज निकाली काढणे न्यायोचित ठरते. सबब, मुददा क्र. २ च्या अनुषंगाने खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

KADAM NUTAN SACHIN
Digitally signed by KADAM NUTAN SACHIN
Date: 2025.07.10 07:20:33 +0530

स्थळ–कवठेमहांकाळ (श्रीमती एन.एस.कदम )

दिनांक ०९.०७.२०२५ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

कवठेमहांकाळ

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date -09.07.2025
Order signed by the
Presiding Officer on -09.07.2025
Order uploaded on -10.07.2025